महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे

## (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र. ०२०-२६१२३३७१ E-Mail- homebranchpune@gmail.com

---

वाचा - १) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३०, ३३,३४,४१ व कलम ५१.

२) भारतीय साथरोग अधिनियम १९८७.

३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्र.करोना २०२०/ प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि .१३/०३/२०२०, दि .१४/३/ २०२० तसेच दि .१५/३/ २०२० रोजीची अधिसुचना

४) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग दि.०७/०९/२०२० रोजीची अधिसुचना

५) आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसनम, महसूल व वनविभाग यांचेकडील पत्र क्र.आव्यप्र-२०२०/ प्र.क्र.९२/आव्यप्र-१ दिनांक ११ सप्टेंबर २०२०.

६) या कार्यालयाचे आदेश क्र. जि. आ.व्य/कावि/२६३८/२०२०, दि.१२/०९/२०२०

७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट राज्य यांचेकडील क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.१३/०४/२०२१

८) मा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य, यांचेकडील पत्र क्र. कोविड/ ऑक्सीजन पुरवठा/१७०- २०२१/०८, दि.११/०४/२०२१

---

जिल्हाधिकारी पुणे

क्र.जि.आ.व्य./कावि/ 583 /२०२१.
पुणे, दिनांक :१९/०४/२०२१.

**विषय:-** कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी पुणे जिल्हयात ऑक्सीजन पुरवठा करणाऱ्या वाहनांना ॲम्बुलन्स दर्जा देवून मेडिकल ऑक्सीजन वाहतुकीबाबत.

**आदेश-**

**ज्याअर्थी,** आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दिनांक १३ मार्च, २०२० पासुन लागु करुन खंड २, ३, ४ मधील तरतुदीची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भिय ३ अन्वये प्रसिध्द केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

**ज्याअर्थी,** पुणे जिल्हयातील ग्रामीण व शहरी भागात मोठया प्रमाणात कोरोना (कोविड- १९) विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव होऊन रुग्ण संख्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे पुणे जिल्हयातील कोव्हिड रुग्णांवर उपचार करणेसाठी CCC /DCH /DCHC खाजगी रुग्णालय कार्यान्वित करणेत आलेले आहेत. सदर कोव्हिड रुग्णांवर उपचार करणेसाठी CCC/DCH/DCHC खाजगी रुग्णालय या ठिकाणी ऑक्सीजन पुरवठा करण्यासाठी सिलेंडर्स त्याचप्रमाणे सक्शन यंत्रणा व पाईपलाईन करणेत आलेली आहे. कोव्हिड रुग्णांवर वैद्यकीय उपचारा दरम्यान ऑक्सीजन उपलब्ध करुन देणे अत्यंत आवश्यक आहे.

**ज्याअर्थी,** वरील वाचा क्र. ८ अन्वये कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी, पुणे जिल्हयात ऑक्सीजन पुरवठा सनियंत्रण समिती गठीत करुन, ऑक्सीजन उत्पादक आस्थापना व रिफीलींग आस्थापना यांना आदेशीत करण्यात आलेले आहे. तरी ऑक्सीजन वाहतूक करणाऱ्या टँकरला पुरवठयाचे ठिकाणी तात्काळ पोहचणेस वाहनांच्या वाहतूक कोंडीमुळे तसेच टोलनाकयावरील रांगामुळे विलंब होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

ज्याअर्थी, वरील वाचा क्र. ५ अन्वये कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी, रुग्णांच्या उपचारासाठी आवश्यक असलेल्या मेडीकल ऑक्सीजनचा पुरवठा तातडीने व विहीत कालावधीत उपलब्ध व्हावा याकरिता मेडीकल ऑक्सीजन पुरवठा करणा-या वाहनांना रुग्णवाहिकेचा (Ambulance) दर्जा देण्याची कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. राजेश देशमुख, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी पुणे,** पुणे जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागामध्ये कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना परिणामकारकरित्या होण्याच्या दृष्टीने, कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) उपचार करणाऱ्या सर्व रुग्णालयांना ऑक्सीजन पुरवठा अखंडीतपणे होण्यासाठी ऑक्सीजन वाहतूक करणारे टँकर / हॉस्पीटल मधील छोटे / मोठे ऑक्सीजन सिलेंडर पुरवठा करणारी वाहने विना अडथळा हॉस्पीटल पर्यंत पोहचण्याकरीता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१. ऑक्सीजन वाहतूक करणाऱ्या टँकर्सवर सायरन व जीपीएस यंत्रणा बसविणेत यावी, याबाबत प्रादेशिक परिवहन विभाग यांनी खात्री करावी.
२. पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड तसेच पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण यांनी आपले अधिनस्त अधिकारी / कर्मचारी यांना ऑक्सीजन वाहतूक करणाऱ्या टँकर्सना वाहतूकीचा अडथळा होऊ नये याकरीता तात्काळ मार्गीका खुल्या करुन देण्याबाबत सूचीत करण्यात यावे. संबंधीत आस्थापनांच्या मागणीनुसार तात्काळ पोलीस बंदोबस्तात ऑक्सीजन पुरवठा करणारी वाहने मार्गस्थ करावीत.
३. ऑक्सीजन उत्पादक आस्थापना व रिफीलींग आस्थापना यांनी अखंडीतपणे ऑक्सीजन पुरवठा होण्यासाठी वाहन चालक यांची तीन शिफ्ट मध्ये नियुक्ती करावी.
४. ऑक्सीजन उत्पादक आस्थापना व रिफीलींग आस्थापना यांनी वाहनांचे जीपीएस लोकेशन पोलीस यंत्रणेच्या मार्फतीने वाहतूक मार्गावरील टोलनाका व्यवस्थापक यांना कळविण्यात यावे.
५. ऑक्सीजन उत्पादक आस्थापना व रिफीलींग आस्थापना यांनी अत्यावश्यक सेवेचे ऑक्सीजन वाहतूकीबाबतचे फलक वाहनाच्या दर्शनीभागावर लावावेत.
६. पुणे जिल्हयातील सर्व टोलनाका व्यवस्थापक यांनी ऑक्सीजन पुरवठा करणाऱ्या टँकर / हॉस्पीटल मधील छोटे / मोठे ऑक्सीजन सिलेंडर पुरवठा करणारी वाहने यांचेसाठी स्वतंत्र खुल्या मार्गीका उपलब्ध करुन देण्यात याव्यात.
७. प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, यांनी ऑक्सीजन पुरवठा करणाऱ्या वाहनांना कोविड - १९ चा प्रादुर्भावर कमी होईपर्यंत २४ X ७ या कालावधीत पथ करातून सुट देण्यात आलेली असल्यामुळे पथकर नाक्यांवर अन्य कोणत्याही करणास्तव सदर वाहनांची अडवणूक करण्यात येऊ नये.
८. सर्व सुरक्षिततेचे नियम ( Safety Norms) पाळून अडथळारहित वाहतूक सुरू ठेवावी.
९. मेडीकल ऑक्सीजनचा पुरवठा करणाऱ्या वाहनांना रुग्णवाहिकेचा (Ambulance) दर्जा देण्याची कार्यवाही शासनाने दिलेल्या सुचनेप्रमाणे प्रादेशिक परिवहन विभागाने करावी.

सदर आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणतीही व्यक्ती अथवा संस्थेवर भारतीय दंड संहिता १८६० याच्या कलम १८८, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व साथ रोग नियंत्रण कायद्यातील तरतुदी प्रमाणे फौजदारी कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

जिल्हाधिकारी पुणे

**(डॉ. राजेश देशमुख)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

प्रति - १) मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड, पुढील योग्य त्या कार्यावाहीसाठी
२) पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण, पुढील योग्य त्या कार्यावाहीसाठी
३) प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे व पिंपरी चिंचवड, पुढील योग्य त्या कार्यावाहीसाठी
४) प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, वारजे पुणे, पुढील योग्य त्या कार्यावाहीसाठी
५) सर्व संबंधीत उत्पादक व पुरवठा आस्थापना प्रमुख -------------------------- पुढील योग्य त्या कार्यावाहीसाठी

प्रत - १) मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका / पिंपरी चिंचवड महानगरपालिका
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे.
३) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, औंध पुणे
४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद पुणे
५) अधीक्षक, राजय उत्पादन शुल्क, पुणे
६) सहआयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, पुणे
७) महाव्यवस्थापक जिल्हा उदयोग केंद्र, पुणे
८) तहसिलदार--------------------------------

प्रत - १) मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई-३२
२) मा. सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२
३) मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांजकडे माहितीस्तव सादर.